Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# जनावरांच्या आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन
# (कामधेनू दत्तक ग्राम योजनेच्या धर्तीवर)

प्रस्तावना

महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील २० मोठ्या जनावरांचे बाजार व ४ शेळ्या मेंढ्यांच्या बाजाराचे बळकटीकरण / आधुनिकीकरण सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीत या प्रकल्पांतर्गत करण्यात येणार आहे. तेव्हा या जनावरांच्या बाजाराच्या लाभक्षेत्रात प्रतिवर्ष २ जनावरांच्या आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करण्यात यावे. दरवर्षी ४८ शिबीरांचे नियोजन करण्यात येणार असून प्रकल्प कालावधीमध्ये एकुण २८८ शिबीरांचे नियोजन करण्यात यावे.

सदर उपघटकाची अमंलबजावणी कामधेनू दत्तक-ग्राम योजनेच्या धर्तीवर राबविण्यात यावी. शिबीरासाठी निवडलेल्या दत्तक गावामध्ये उपघटक राबविण्यामागील मुख्य सूत्र असे आहे की सदर उपघटक राबविणेकरिता कृती आराखडा सर्व संस्थांना देणेत येईल. योजनेचे दूध वाढीचे उदिष्ट लक्षांत घेता, उपघटक सुरु करतेवेळी शेतकरी व दुधाळ जनावर निहाय दुध उत्पादनाची आकडेवारी घेणेत येऊन उपघटक अमंलबजावणीनंतर सहा महिन्यांचा कालावधी संपल्यावर पुन्हा दुध वाढीसंबंधी सर्व आकडेवारी घेणेत येऊन नेमकी फलनिष्पत्ती काय झाली याचा आढावा घेण्यात यावा व उपघटकच्या फलनिष्पत्तीचे यथायोग्य मूल्यमापन करण्यांत यावे.

उपघटकाचे कार्यक्षेत्र, उपघटक राबविण्याचा कालावधी

महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील २० मोठ्या जनावरांचे बाजार व ४ शेळ्या मेंढ्यांच्या बाजाराचे बळकटीकरण /आधुनिकीकरण सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत या प्रकल्पांतर्गत करण्यात येणार आहे. तेव्हा या जनावरांच्या बाजाराच्या लाभक्षेत्रात प्रतिवर्ष २ शिबीरांचे आयोजन करण्यात यावे. प्रकल्प कालावधीमध्ये एकुण २८८ शिबीरांचे नियोजन करण्यात यावे.

उपघटकाचे स्वरुप

निवडलेल्या गावामध्ये दुधात असलेल्या तसेच भाकड संकरीत गाई / देशी गाई / म्हशी यांची शेतकरी निहाय गणना व त्यावेळी असलेले दुध उत्पादन यांचे सर्वेक्षण संबंधित पशुवैद्यकीय संस्थेव्दारे करुन घेण्यात यावे. तसेच सदर गाई - म्हशींच्या वंध्यत्वाबाबतची प्राथमिक माहिती सर्वेक्षणाचे वेळी घेण्यात यावी. निवड झालेल्या गावांमध्ये विशेष ग्राम सभांचे उपघटक अमंलबजावणीच्या विविध टप्प्यांवर आयोजन करुन स्थानिक पशुपालकांना उपघटकाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी, त्यांचा उपघटक अमंलबजावणीमधील नेमक्या सहभागाबाबत माहिती देण्यात यावी. दुध संकलन केंद्र, प्राथमिक सहकारी दुध संस्था यांच्या सक्रिय सहभागाबाबतचे नियोजन करावे. उपघटक अमंलबजावणी कालावधीमध्ये जंतनाशक औषधे पाजणे कार्यक्रम, गोचीड-गोमाशा निर्मूलन कार्यक्रम, निकृष्ठ चारा सकस करण्याकरिता प्रात्यक्षिकांचे आयोजन, दुग्ध स्पर्धांचे आयोजन व लसिकरण शिबीरांचा कृती आराखडयामध्ये समावेश करण्यात येईल. वंध्यत्व निवारण शिबीरे व पाठपुरावा देखिल करण्यात यावा.

या आरोग्य तपासणी शिबीरांमध्ये प्रत्येक जनावराची तपासणी करण्यात येऊन शिबीरात आलेल्या जनावरांचे रक्तजल नमुने, शेण नमुने, दूध नमूने,त्वचा नमुने, गर्भाशयातील स्त्राव इत्यादी नमुन्यांची प्रयोगशालेय तपासणी करण्याचे आयोजन करण्यांत यावे. अशा नमुना तपासणीवरुन लोहाची, हिमोग्लोबीनची, प्रोटीन, कॅल्शियम व फॉस्फरस इत्यादी महत्वांच्या मूलद्रव्यांची कमतरता, गर्भाशय दाह,स्तनदाह, इत्यादी आजारांचे नेमके निदान करुन त्या अनुषंगाने समर्पक औषधोपचार करण्यांत यावा.

आरोग्य तपासणी शिबीरांमध्ये आवश्यकतेनुसार जंतनाशके, खनिज मिश्रणे, जीवनसत्वे, निदान झालेल्या विविध रोगांवरील आवश्यक ती औषधे इत्यादींचा पुरवठा करण्यांत यावा. जेणेकरुन संबंधित रोगांचे निराकरण होऊन जनावरांचे स्वास्थ्य सुधारेल व पर्यायाने दुध उत्पादनामध्ये वाढ होईल. उपघटक नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर उपघटकामध्ये सहभागी झालेल्या सर्व जनावरांचे दुध उत्पादनाबाबत पुन:श्च सर्वेक्षण करण्यांत यावे. सदर उपघटकाचा वेळोवेळी आढावा घेण्यांत येऊन, उपघटकाची अंमलबजावणी करतांना येणा-या अडीअडचणींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यकतेनुसार कर्मचारी, अधिकारी व निवडक पशुपालक यांचेशी संवाद साधण्याकरितां वेळोवेळी सामुहिक चर्चा सत्रे, शिबीरे/कार्यशाळांचे आयोजन करण्यांत यावे. उपघटकाच्या प्रभावी तसेच यशस्वी अंमलबजावणीसाठी गावांतील प्राथमिक सहकारी संस्थेचा सक्रिय सहभाग घेण्यांत यावा. अशा रितीने उपघटकाचा सहा महिन्यांचा विहित कालावधी संपल्यानंतर उपघटकाच्या दृश्य

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

फलनिष्पत्तीमुळे (दुध उत्पादनांतील झालेल्या वाढीमुळे) जवळपासच्या गावांतील अन्य शेतकरी/पशुपालक देखिल या उपघटकाचा स्वतःहून अंगीकार करण्यास उद्युक्त होतील. या शिवाय जनावरांच्या बाजारामध्ये उपलब्ध होणारी जनावरे रोगमुक्त व आरोग्यदायी असतील. पर्यायाने बाजारातून खरेदी करण्यात येणाऱ्या जनावरांची प्रतवारी सुधारलेली असेल व याचा लाभ शेतकऱ्यांना/पशुपालकांना होणार आहे.

गावाची निवड

स्थानिक स्तरीय संस्थांचे अंतर्गत पशु आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यासाठी गावाची निवड संबंधित पशुधन विकास अधिकारी विस्तार यांनी करावे. गाव निवडीचे प्रस्ताव जिल्हा पशुसंवधर्न अधिकारी यांचे मार्फत जिल्हा निवड समितीकडे सादर करावे. राज्यस्तरीय संस्थांचे अंतर्गत पशु आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यासाठी गावाची निवड संबंधित जिल्हास्तरीय आरोग्य तपासणी शिबीराच्या गावाची निवड समितीने करावी.

जिल्हास्तरीय निवड समिती

| | |
|---|---|
| § जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | अध्यक्ष |
| § जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| § सहा. आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा पशुसर्वचिकीत्सालय | सदस्य |
| § सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय | सदस्य सचिव |

निवडीचे निकष

उपघटक राबवितांना पहिल्या टप्प्यामध्ये संबंधित आर्थिक वर्षामध्ये गावाची निवड करतांना पुढील निकषांचे पालन करण्यात यावे-

म.स्प.कृ.वि. प्रकल्पांतर्गत विकसीत करण्यात येणा-या जनावरांच्या बाजाराच्या लाभक्षेत्रातील गावाची निवड प्राधान्याने करावी तथा सदर गावामध्ये प्रस्तावित दुध संकलन केंद्राचे (खाजगी डेअरी/सहकारी दुध संस्था/शासकीय दुध संस्था इत्यादी मार्फत संचालित) मार्गावरील असावे.

१) सदर गावामध्ये पैदासक्षम गायी/म्हशींची संख्या किमान ३०० असावी.
२) पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रांतील ज्या गावांमध्ये दुधाळ जनावरांची संख्या सर्वात जास्त असेल त्या गावाची प्राधान्याने निवड करावी.

गावाची निवड करतांना त्या गांवाचे सरपंच व ग्राम सेवक तसेच दुध संकलन केंद्र/डेअरी सोसायटीचे मुख्य पदाधिकारी यांच्या संयुक्त संमतीपत्रकाव्दारे त्यांचा व ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग मिळणेबाबतची निश्चिती प्राप्त करुन घ्यावी.

लाभार्थी निवडीचे निकष- निवडलेल्या गावातील सर्व दुग्धोत्पादक शेतक-यांना सदर उपघटकाचा लाभ देय राहील.

उपघटकाचे अंदाज पत्रक

सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये निवडण्यांत आलेल्या प्रत्येक गावातील रु.१,५५,०००/- तरतूद आवश्यक राहील. हा निधी ३०० पैदासक्षम व दुधाळ जनावरांच्या संख्येनुसार परिगणित केलेला आहे. सदर तरतुदीमधून खालीलप्रमाणे खर्च करण्यांत यावा :-

| अ.क्र. | बाब | | प्रस्तावित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | गावातील दुधाळ जनावरांसाठी जंतनाशक पाजणे शिबीरे. | : | १७,५००.०० |
| २. | गावातील जनावरांसाठी खनिज द्रव्ये मिश्रण व जीवनसत्व पुरवठा. | : | १,००,०००.०० |
| ३. | गावातील जनावरांसाठी गोचिड, गोमाशा निर्मूलन शिबीर. | : | १५,०००.०० |
| ४. | गावातील वंध्यत्व निवारण शिबीर आयोजीत करणे. | : | १५,०००.०० |
| ५. | गावातील सर्व शिबीरांसाठी प्रसिध्दी व प्रचार मोहिम राबविणे. – कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे बॅनर-पोस्टर, व्हिडिओ चित्रिकरण, फोटो, लिफलेट/ पॉम्फलेट /स्टेशनरी ,कार्यक्रम आयोजनाचा अनुषंगिक खर्च ई. * | : | ७,५००.०० |
| | ए कू ण :- | | १,५५,०००.०० |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

- * सदर शिबीरासाठी प्रती शिबीर ७५००/- तरतूद करण्यात आलेली असून हा निधी अर्थसंकल्प वितरीत प्रणालीव्दारे (बीडीएस) संबधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे वितरीत होणार आहे.

अशा रितीने एका गावातील सरासरी ३०० पैदासक्षम गायी/म्हशींसाठी करावयाचा एकूण खर्च रु.१,५५,०००/- यास सिमित राहून आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करण्यात यावे.

| वर्ष | तरतूद (रुपये लाखात) | शिबिरांची संख्या. |
|---|---|---|
| सन २०११-१२ | १८.६० | १२ . |
| सन २०१२-१३ | २७.९० | १८ |
| सन २०१३-१४ | ५५.८० | ३६ |
| सन २०१४-१५ | १७६.७० | ११४ |
| सन २०१५-१६ | १६७.४० | १०८ |
| ए कू ण :- | ४४६.४० | २८८ |

उपघटकाचे संनियंत्रण.

जिल्हा पातळीवर या उपघटकाची संनियंत्रण संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडून करावे. तसेच विभागिय पातळीवर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि राज्य पातळीवर अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर उपघटकाचे संनियंत्रण करतील. सदर उपघटकाच्या कृति आराखडयामधील वेळापत्रकानुसार आयोजीत सर्व शिबीरे/ कार्यक्रमांमध्ये संस्था स्तरावरील सर्व स्थानिक कर्मचारी व अधिकारी यांनी योग्य तो सहभाग घेणे बंधनकारक राहील. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी ५० टक्के शिबीरे / कार्यक्रमांना तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी किमान १० टक्के शिबीरे/कार्यक्रमांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे अनिवार्य राहील.

उपघटकाच्या सुरुवातीस निवडलेल्या गावांतील दुभत्या जनावरांचे दुग्धोत्पादन व योजना पूर्णपणे राबविल्यानंतरचे सदर गांवातील दुग्धोत्पादन यांची नोंद योग्य रीतीने ठेवली आहे किंवा नाही याचे पर्यवेक्षण पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी / कर्मचारी करतील. आयोजीत केलेली सर्व शिबीरे, त्यामध्ये सहभागी झालेले पशुपालक व त्यांच्या जनावरांची संख्या याबाबतच्या आवश्यक सर्व नोंदी संबंधित नोंदवहीमध्ये घेण्यांत आल्या आहेत याचेही पर्यवेक्षण करतील आणि या नोंदीनुसार गोषवारे सदर गावाच्या ग्रामपंचायतीचे स्तरावर सुचना फलकावर प्रसिध्द् करण्यांत येतील, जेणेकरुन अन्य गावांतील ग्रामस्थांना देखील ते पाहता येतील व त्यापासून प्रेरणा घेऊन ही योजना त्यांचेही गावांत घेण्यासाठी त्यांना उद्युक्त करता येईल.

उपघटकाची फलनिष्पत्ती

- निवडलेल्या गावांतील पशुधनामध्ये आरोग्य तपासणी शिबीरांच्या आयोजनाद्वारे जंत निर्मूलन, बाहय किटक निर्मूलन, वंध्यत्व निवारण, रोग प्रतिबंधक लसिकरण, खाद्य व चारा व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन, पैदाशीबद्दल मार्गदर्शन व कृत्रिम रेतन या महत्वाच्या बाबींची एकत्रितरित्या अंमलबजावणी केल्यामुळे जनावरांचे स्वास्थ्य चांगले राहून, पर्यायाने त्यांच्या दूध उत्पादनांत वाढ होईल.
- प्रस्तुत उपघटकाची अंमलबजावणी केल्यानंतर त्या गावांतील दुग्धोत्पादनामध्ये किमान १० टक्के वाढ होणे सुनिश्चित आहे. या बरोबरच सदर उपघटकाच्या अंमलबजावणीमध्ये शेतकरी/पशुपालकांचा आणि प्राथमिक सहकारी दुध संस्थेचा सातत्यपूर्वक व सक्रिय सहभाग घेतल्यामुळे व त्यांना उपघटकाचे महत्व पटल्यानंतर उपघटकाच्या अंमलबजावणी काळानंतरही पशुधनाची योग्य ती काळजी त्यांचेकडून घेण्यांत आल्यानंतर दुध उत्पादनांतील वाढीचे सातत्य राखणे शक्य झाल्याचे अनुभवास आले आहे.
- नजिकच्या गावांतील शेतकरी व पशुपालक देखिल या उपघटकाची फलनिष्पत्ती पाहिल्यानंतर उपघटकाचा स्वत:हून अंगीकार करण्याकडे उद्युक्त होतील. तसेच जनावरांच्या बाजारामध्ये उपलब्ध होणारे जनावरे रोगमुक्त व आरोग्यदायी असे असतील.त्यामुळे बाजारातून खरेदी करण्यात येणाऱ्या जनावरांची प्रतवारी सुधारलेली असेल. याचा लाभ शेतकऱ्यांना / पशुपालकांना होणार आहे.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## जनावरांच्या आरोग्य तपासणी शिबीरांच्या अंमलबजावणीची रुपरेषा (कामधेनू दत्तक ग्राम योजनेच्या धर्तीवर)

गावाची निवड केल्यानंतर कृति आराखडा तयार करण्यांत यावा. त्यामध्ये खाली नमूद केल्यानुसार शिबीरांचा/कार्यक्रमांचा समावेश करुन वेळापत्रक निर्धारित करावे. त्यानुसार विहीत कालमर्यादेमध्येच sequential steps नुसार विवक्षित शिबिरे/कार्यमोहिमांचे आयोजन करण्यात यावे.

### उपघटकाच्या अंमलबजावणीची रूपरेषा :-

- Ø कार्यवाहीचा टप्पा क्र.-१ अद्ययावत पशुगणना – निवडलेल्या गावामध्ये दुधात असलेल्या व भाकड संकरित गायी/ म्हशींची / देशी – गावठी गायी - म्हशींची गणना करण्यात यावी. (परिशिष्ट ४ प्रमाणे) ही गणना करताना शेतकरी / पशुपालक निहाय गणना करून दुग्धोत्पादनातील सर्व गायी- म्हशींच्या दुग्धोत्पादनाची प्रत्येक दुधाळ जनावरनिहाय व्यवस्थित नोद करावी.हे सर्वेक्षण संबंधित गावातील / नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुसंवर्धन कर्मचाऱ्याने / प.वि.अ. याने करावे.तसेच सदर गावातील गायी-म्हशींच्या लैंगिक आरोग्य स्थितीबाबतही सदर सर्वेक्षणामध्ये प्राथमिक अंदाज घेण्यात यावा.
- Ø कार्यवाहीचा टप्पा क्र.-२ विशेष सभा / ग्रामसभेचे आयोजन –निवडलेल्या गावामध्ये विशेष सभा / ग्रामसभेचे आयोजन करून स्थानिक पशुपालक / शेतकऱ्यांना योजनेबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. याच सभेच्या वेळी पशुपालकांना उपघटकामध्ये जी शिबिरे / कार्यमोहिमा आयोजित करण्यात येणारआहेत, त्यांबाबतचे वेळापत्रक /Time Schedule सांगण्यात यावे व सदर वेळापत्रक ग्राम पंचायतीच्या नोटीस बोर्ड- सूचना फलकावर लावावे जेणेकरून ते सहजपणे सर्व ग्रामस्थांच्या नजरेस येईल व कार्यमोहिमा/शिबिरांचे वेळापत्रक त्यांचे स्मरणात राहील.या स्तव आवश्यकता भासल्यास होर्डिंग / बॅनर देखील सदर गावात योग्य ठिकाणी लावण्यात यावेत. याच सभेच्या वेळी स्थानिक पशुपालक, दुध संकलन केंद्र, सहकारी दुध संस्था यांचा नेमका कशाप्रकारे सहभाग या उपघटकामध्ये मिळणे आवश्यक आहे, त्याबाबत स्पष्ट कल्पना त्यांना देवून सहकार्य करण्याबाबत व सहभागी होण्यासाठी आवाहन करावे. (परिशिष्ट ५ प्रमाणे)
- Ø कार्यवाहीचा टप्पा क्र.-३ जंतनाशक औषधे पाजणे / जंतनिर्मूलनासाठी शिबिराचे आयोजन- गावातील सर्व जनावरांना (गायी, म्हशी, बैल, रेडे, वासरे, पारडया इत्यादी) पूर्वनियोजित दिनांकास जंतनिर्मूलन शिबिराचे आयोजन करून जंतनाशक औषधे पाजणे, आवश्यकतेनुसार जंतनाशक औषधे inject करणे ही कार्यवाही करावी. शक्यतो सर्वच जनावरांना जंतनाशके दिली जातील याची खात्री करावी.या शिबिराचे वेळी रँडम पद्धतीने जनावरांचे शेण-नमुने प्रयोगशालेय तपासणीसाठी गोळा करून नंतर त्यांची पशुवैद्यकीय दवाखान्यात तपासणी करावी. (परिशिष्ट ६ प्रमाणे)
- Ø कार्यवाहीचा टप्पा क्र.-४ गोचीड / गोमाशा (बाह्यकीटक) निर्मूलन शिबिराचे आयोजन
- Ø जंतनाशक औषधे पाजणी शिबीर आयोजीत केल्यानंतर एक आठवडयाच्या अंतराने सदर गावांमध्ये जनावरांच्या अंगावरील तसेच गोठयांमधील गोचीड / गोमाशा व अन्य बाहय कीटकांचे निर्मूलन करण्यांसाठी शिबीर आयोजीत करण्यांत यावे. या शिबीरामध्ये गावांतील सर्व जनावरांचा सहभाग राहील तसेच सर्व गोठयांचा समावेश केला जाईल याची निश्चिती करावी. या शिबीरामध्ये जनावरांवर तसेच पशुपालकांकडील गोठयांमध्ये गोचीड/गोमाशांचे निर्मूलनासाठी औषधांची फवारणी करावी. (परिशिष्ट ७ प्रमाणे)
- Ø कार्यवाहीचा टप्पा क्र.-५ रोगप्रतिबंधक लसिकरण कार्यक्रम मोहिम स्वरुपांत घेणे –
पूर्व नियोजीत दिनांकास सदर गावांतील जनावरांना आवश्यकतेनुसार घटसर्प, फ-या, आंत्राविषार, लाळ-खुरकूत इत्यादी संसर्गजन्य रोगांच्या प्रतिबंधक लसिकरणाचा कार्यक्रम घेण्यांत यावा आणि त्यांच्या योग्य त्या नोंदी ठेवण्यांत याव्यात.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

- कार्यवाहीचा टप्पा क्र.-६ पहिल्या वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे – गोचीड/गोमाशा निर्मूलन शिबीर घेतल्यानंतर आठ दिवसांच्या आंत सदर गावांमध्ये पहिले वंध्यत्व निवारण शिबीर घेण्यांत यावे व त्यामध्ये सहभागी होणा-या प्रत्येक गायी/म्हशीची तपासणी करुन त्याबाबतच्या सर्व आवश्यक नोंदी ठेवण्यांत याव्यांत. तपासणी आणि प्रत्यक्ष लक्षणांवरुन निदान केल्यानंतर आवश्यक तो औषधोपचार करण्यांत यावा. त्याचप्रमाणे शिबीरांत आलेल्या जनावरांचे रक्तजल नमुने, शेणनमुने, गर्भाशयांतील स्त्राव इत्यादी नमुने प्रयोगशालेय तपासणीसाठी घेण्यांत यावेत. अशा नमुन्यांवरुन जनावरांमधील लोहाची, हिमोग्लोबीनची, प्रोटीनची, कॅल्शियम व फॉस्फरस इत्यादी महत्वांच्या मूलद्रव्यांची कमतरता, गर्भाशयाचा दाह इत्यादी आजारांचे नेमके निदान करणे शक्य होईल. (परिशिष्ट ८ प्रमाणे)
- कार्यवाहीचा टप्पा क्र.-७ निकृष्ट चारा सकस करणेबाबतचे प्रात्यक्षिक :- बरेच वेळा जनावरांसाठी सकस चारा उपलब्ध असतो असे नाही. त्यासाठी शेतक-याकडे उपलब्ध असलेला निकृष्ट चारा सकस करण्यासाठी प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यांत यावे. त्यामध्ये निकृष्ठ चा-यावर ४ टक्के युरिया द्रावणाचा वापर करुन चारा सकस कसा करता येईल याचे प्रात्यक्षिक देण्यांत येईल.
- कार्यवाहीचा टप्पा क्र.-८ दूग्ध स्पर्धांचे आयोजन :- जनावरांचे संगोपन उत्तम पध्दतीने कसे करावयाचे याची माहिती पशुपालकांना व्हावी तसेच ज्या पशुपालकांनी जनावरांचे संगोपन उत्तम पध्दतीने केले आहे त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दुग्धस्पर्धा व संकरीत वासरांच्या मेळाव्यांचे आयोजन करण्यांत यावे. तसेच स्वच्छ दूध उत्पादन करण्यासाठी (Clean Milk Production) ध्वनी चित्रफिती दाखविण्यांत याव्यांत.
- कार्यवाहीचा टप्पा क्र.-९ विशेष ग्राम सभा क्र. २ चे आयोजन :- गावामध्ये दुस-या ग्राम सभेचे नियोजीत दिनांकास आयोजन करावे. सदर सभेमध्ये दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन, दुधाळ जनावरांचा आहार, शास्त्रोक्त पध्दतीचा गोठा, जनावरांमधील वंध्यत्व व त्यावरील उपाययोजना, मूलद्रव्यांची कमतरता, जनावरांमधील विविध आजार व उपाययोजना, (Feeding, Breeding & Management) याबाबत दृकश्राव्य माध्यमातून सर्व पशुपालकांना माहिती देण्यांत यावी. तसेच सदर योजने अंतर्गत पशुपालकांनी व स्थानिक कर्मचा-यांनी तो पर्यन्त केलेल्या कामांचा आढावा घेण्यांत यावा.
- कार्यवाहीचा टप्पा क्र.-१० पाठपुरावा वंध्यत्व निवारण शिबीर आयोजीत करणे :- प्रथम वंध्यत्व निवारण शिबीरानंतर ३ महिन्यांच्या अंतराने दुसरे पाठपुरावा शिबीर घेणेत यावे. सदर शिबीरामध्ये पहिल्या शिबीरातील उपचार केलेल्या जनावरांचा पाठपुरावा करण्यांत येऊन त्यामध्ये काय सुधारणा झालेली आहे याबाबतची नोंद घेण्यांत यावी. तसेच मागील शिबीरांमध्ये कृत्रिम रेतन केलेल्या गाई, म्हशींपैकी किती जनावरे गाभण राहिली याचीही नोंद घेण्यांत यावी व मागील शिबीरांमध्ये उपचाराने सुधारणा न झालेल्या जनावरांची पुनश्च तपासणी करुन निदानानुसार उपचार करण्यांत यावेत.
- कार्यवाहीचा टप्पा क्र. ११ विशेष ग्राम सभा क्र. ३ चे आयोजन :- पशुपालकांना वंध्यत्व असलेल्या जनावरांच्या रोग निदानाबाबत परिपूर्ण माहिती करुन देणे, (प्रयोगशालेय निष्कर्षांच्या आधारे) हा या ग्राम सभेचा प्रमुख उद्देश राहील. त्याचप्रमाणे पशुपालकांच्या जनावरांचे व्यवस्थापन व इतर बाबींच्या संदर्भात शंक-निरसन इत्यादी कार्यक्रम या सभेमध्ये घेण्यांत यावेत.
- कार्यवाहीचा टप्पा क्र.१२ वंध्यत्व निवारण शिबीर क्र.३ चे आयोजन :- कायम स्वरुपाचे वंध्यत्व असणा-या जनावरांबाबत त्या-त्या पशुपालकास स्पष्ट कल्पना देणे तसेच अजुनही तात्पुरते वंध्यत्व असलेल्या जनावरांना योग्य तो औषधोपचार करणे या बाबींचा अंतर्भाव सदर शिबीरामध्ये करण्यांत यावा.
- वरील सर्व कार्यक्रमांचे आयोजन करतांना प्रचलित शासकीय दराने सेवाशुल्क आकारण्यात यावे.
- पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनावरांची आरोग्य तपासणी शिबीरे (कामधेनू दत्तक ग्राम योजनेच्या धर्तीवर) ही योजना विशेष आव्हान म्हणून स्विकारुन मोहीम स्वरुपात (**Mission Mode** वर) राबवावी.
- उपघटकाचा प्रगती अहवाल सादर करणे – या उपघटकाअंतर्गत सर्व कार्यक्रमांच्या टप्पेनिहाय अंमलबजावणीच्या आवश्यक त्या सर्व नोंदी ठेवून कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यानंतर तसेच दरमहा संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे उपघटकाचा प्रगती अहवाल सादर करावा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांचे

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

विभागाचा सदर उपघटकाचा अहवाल संकलित करून दरमहा १० तारखेपर्यंत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.(परिशिष्ट ३ ते ९ प्रमाणे)

Ø उपघटकाची अमंलबजावणीपासून वरील सर्व कार्यक्रम नियोजनबध्द् पध्दतीने राबविल्यानंतर म्हणजेच एकूण ६ महिन्यांच्या कालावधीनंतर योजनापूर्ण झाल्यानंतर सर्व जनावरांचे दूध उत्पादनाबाबत पुन्हा सर्वेक्षण करण्यांत यावे व त्याच्या स्वयंस्पष्ट नोंदी कराव्यात. अशा रीतीने योजना राबविल्यानंतर सदर गावाच्या दैनंदिन दूध उत्पादनामध्ये किती वाढ झाली, याची नोंद करावी. (परिशिष्ट ९ प्रमाणे)

जिल्हा स्तरावरुन सदर योजनेचा वेळोवेळी आढावा घेणे, अडीअडचणींबाबत मार्गदर्शन करणे, यासाठी कर्मचारी/अधिकारी तसेच निवडक पशुपालक यांचेशी संवाद साधून सदर योजना अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार दरमहा तालुका/जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यांत यावे.

-----------------------

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

जनावरांची आरोग्य तपासणी शिबीरे आयोजन - वर्षनिहाय / जिल्हावार भौतिक उद्दिष्टांचे विवरण

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| २ | करंजा | वाशिम | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| ३ | पुसद | यवतमाळ | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| ४ | मेहकर | बुलढाणा | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| ५ | नेवासा | अहमदनगर | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | १२ | २ | २ | २ | ३ | ३ |
| टप्पा १ एकूण | | | ७२ | १२ | १२ | १२ | १८ | १८ |
| ७ | सावनेर | नागपुर | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| ८ | लाखनी | भंडारा | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| ९ | आमगाव | गोंदिया | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| १० | कडा | बीड | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| ११ | सांगोला | सोलापुर | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| १२ | अकलुज | सोलापुर | १२ | ० | १ | ४ | ४ | ३ |
| टप्पा २ एकूण | | | ७२ | ० | ६ | २४ | २४ | १८ |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १४ | पाचोरा | जळगाव | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १६ | शिरपुर | धुळे | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १७ | वसई | ठाणे | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १८ | खेड | पुणे | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| १९ | लोणंद | सातारा | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| २० | सांगली | सांगली | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | १२ | ० | ० | ० | ६ | ६ |
| | टप्पा ३ एकूण | | १४४ | ० | ० | ० | ७२ | ७२ |
| | एकुण | | २८८ | १२ | १८ | ३६ | ११४ | १०८ |